दैनिक
# दिव्य मातृछाया
बुलडाणा
गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६
महाराष्ट्राचे एकमेव स्वतंत्र वृत्तपत्र
● वर्ष : पाचवे ● अंक : २९५ ● पाने : ४ ● RNI.NO. MAHMAR/2022/87711 www.matruchhaya.in ● मुख्य संपादक : सादिक कुरेशी 9420647272 ● कार्यकारी संपादक : आसिफ गवळी 9767681555

# फसलेली पीकविमा योजना यंदाही जैसे-थे ?

## २,३०० कोटींचा विमा हप्ता भरूनही, अद्याप शून्य भरपाई

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** खरीप २०२४ मध्ये 'एक रुपयात पीक विमा योजने'त झालेल्या गैरव्यवहारामुळे ही योजना बंद करण्यात आली. त्याऐवजी पीक कापणी प्रयोग हा एकमेव निकष ठेवून गतवर्षी सुधारीत पीकविमा योजना राबविण्यात आली. सुमारे २,३०० कोटी रुपयांचा विमा हप्ता भरूनही गत पावसाळ्यातील नुकसानीपोटी अद्याप एक रुपयाचाही निधी मिळाला नाही. त्रुटींमुळे पीकविमा योजनेतील फसल्याचे स्पष्टपणे समोर आले आहे, तरीही आगामी खरीप हंगामात फसलेली पीक विमा योजना कायम ठेवण्याच्या हालचाली सुरू आहेत.

पावसाळी आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनात पीकविमा योजनेतील त्रुटींवर सर्वपक्षीय आमदारांनी प्रहार केला होता. गत पावसाळ्यात राज्यात सुमारे ८५ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. शेतीतील उभी पिके, जमीन, मातीही वाहून गेली होती. राज्य सरकारला त्यासाठी सुमारे ३१ हजार कोटी रुपयांचे मदत पॅकेज जाहीर करावे लागले होते. इतकी अपरिमित हानी होऊनही पीकविमा योजनेतून शेतकऱ्यांना अद्याप एक रुपयाचीही मदत झाली नाही.

पीक कापणी प्रयोग हा एकमेव निकष ठेवून, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, कीड, रोगाचा प्रादुर्भाव, काढणी पश्चात नुकसान हे निकष वगळल्यामुळे यंदा अतिवृष्टी, अवकाळी आणि पूरस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीन भरपाई मिळाली नाही. पीक कापणी प्रयोग हा एकमेव निकष असल्याचे सांगण्यात आले.

आता राज्यभरातील पीक कापणी प्रयोग पूर्ण झाले आहेत. पुढील खरीप हंगामाची तयारी सुरू झाली आहे. तरीही शेतकऱ्यांना पीकविमा योजनेतून अद्याप एक रुपयाही नुकसान भरपाई मिळालेली नाही.



### अतिवृष्टी मदत पॅकेज, कर्जमाफीमुळे जुनीच योजना ?

- राज्य सरकारने गतवर्षांत अतिवृष्टी, अवकाळी आणि महापुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सुमारे ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते. यंदा कर्जमाफी देण्याची सरकारने घोषणा केली आहे.
- कर्जमाफीसाठी सुमारे २० ते २५ हजार कोटी रुपयांची गरज भासणार आहे. ही रक्कम शेतकऱ्यांसाठीच खर्च झाली आहे. त्यामुळे पीकविमा योजनेत नव्या निकषांची भर घालून राज्य सरकारवर आणखी आर्थिक भार नको, अशी अर्थ विभागाची भूमिका असल्याची चर्चा आहे. त्यामुळे जुनीच पीकविमा योजना पुढे सुरू ठेवण्याच्या हालचाली दिसत आहेत.

### आठवडाभरात भरपाई – कृषिमंत्री

- सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींकडून पीकविमा योजनेचे वगळेलेले निकष पुन्हा लागू करण्याची मागणी होत आहे. या बाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकरी हिताचा निर्णय घेतील. आठवडाभरात विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यास सुरूवात होईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

### केंद्र सरकारची दिरंगाई; देशभरात गोंधळाची स्थिती

- गतवर्षातील विमा योजनेचा आढावा घेऊन, नव्या पीकविमा योजनेचे निकष काय असावेत. हवामान बदलाचा विचार करून शेतकरी हितासाठी निकषांत काय बदल करावेत, यासाठी केंद्र सरकार राष्ट्रीय पातळीवर आढावा बैठक घेऊन नव्या पीकविमा योजनेचे निकष निश्चित करीत असते.
- यंदा अद्याप पर्यंत निकष निश्चित करण्यात आले नाहीत. निकष निश्चितीनंतर नवी योजना लागू करण्यासाठी सुमारे दोन महिन्यांचा काळ जातो. निविदा काढून विमा कंपन्या निश्चित कराव्या लागतात.
- पण, यंदा अद्यापपर्यंत केंद्र सरकारकडून निकष अंतिम करण्यात आले नाहीत. शिवाय गत वर्षाचे निकष कायम ठेवून योजनेची अंमलबजावणी करावी, असेही निर्देश दिलेले नाहीत. त्यामुळे देशभरात पीक विमा योजनेविषयी गोंधळाची स्थिती आहे.

### पीकविमा योजना आकडेवारी

- एकूण पीकविमा धारक शेतकरी – ९१ लाख ९५ हजार
- विमा संरक्षित क्षेत्र – ५८ लाख ९० हजार हेक्टर
- शेतकरी विमा हप्ता – ५३६ कोटी रुपये
- राज्य सरकार विमा हप्ता – ९२८ कोटी रुपये
- केंद्र सरकार विमा हप्ता – ९२८ कोटी रुपये
- शेतकरी, राज्य आणि केंद्र सरकार एकूण विमा हप्ता – २,३९३ कोटी रुपये
- एकूण विमा संरक्षित रक्कम – ३१,६१० कोटी रुपये

# साखरखेर्डा येथे उष्णतेची लाट; ४० अंश तापमानाची नोंद

## दैनंदिन जीवन विस्कळीत बाजार पेठेत शुकशुकाट

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**साखरखेर्डा :** ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून उष्णतेची तीव्रता लक्षणीय वाढली असून, साखरखेर्डा परिसरात तापमानाने 15 एप्रिल रोजी 40 अंश सेल्सियसचा टप्पा पार केला आहे. वाढत्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले असून दैनंदिन जनजीवनावर त्याचा स्पष्ट परिणाम जाणवत आहे.

सकाळी ९ वाजताच उन्हाची तीव्रता जाणवू लागते, तर दुपारी एक ते चार वाजण्याच्या सुमारास उष्णतेच्या लाटा अधिक प्रखर होत आहेत. परिणामी, दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत असून अत्यावश्यक कामाशिवाय नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत.

उन्हाच्या झळांचा सर्वाधिक फटका शेतकरी, मजूर तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या घटकांना बसत आहे. सतत उन्हात काम केल्यामुळे थकवा, चक्कर येणे, अशक्तपणा आणि डोकेदुखी यांसारख्या तक्रारी वाढताना दिसत आहेत.

तज्ज्ञांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करत दुपारच्या वेळेत बाहेर जाणे टाळावे, असा सल्ला दिला आहे. यासोबतच पुरेशा प्रमाणात पाणी, लिंबूपाणी, ताक यांसारख्या द्रवपदार्थांचे सेवन करावे, असेही सांगण्यात आले आहे. बाहेर पडताना डोक्यावर टोपी किंवा रुमाल वापरणे, डोळ्यांसाठी गॉगल लावणे तसेच सैल आणि हलक्या रंगाचे कपडे परिधान करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हवामानातील बदलांमुळे यंदा ग्रामीण भागातही उष्णतेचा प्रभाव अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, हवामान खात्याने पुढील काही दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली असून नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




**"वाढत्या तापमानामुळे डिहायड्रेशन, उष्माघात तसेच चक्कर येण्याच्या तक्रारी वाढू शकतात. त्यामुळे नियमित जास्त पाणी पिणे, दुपारच्या उन्हापासून दूर राहणे आणि शरीर थंड ठेवण्यासाठी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी अधिक सतर्क राहावे. घरातून बाहेर पडतांना डोक्याला दस्ती रुमाल घालुनच बाहर पडावे त्रास जानवत असल्यास त्वरित उपचार केंद्रात दाखल व्हावे.**

**- डॉ. योगेश झाल्टे**

# घरकुलच्या अनुदानासाठी लाच घेणे भोवले

## अभियंता सचिन इंगळे रंगेहाथ पकडला

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मोताळा :** येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केलेल्या सापळा कारवाईत पंचायत समिती मोताळा येथील कंत्राटी ग्रामीण गृह निर्माण अभियंता सचिन शत्रुघ्न इंगळे (वय ३३) याला १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. ही कारवाई १५ एप्रिल २०२६ रोजी पिंपळगाव राजा–मोताळा रोडवरील फुली फाटा येथे करण्यात आली.

तक्रारदाराच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाच्या दुसऱ्या हप्त्याची (७० हजार रुपये) प्रक्रिया पूर्ण करून देण्यासाठी आरोपी इंगळे यांनी २५ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार एसीबी बुलढाणा येथे प्राप्त झाली होती.

त्यानुसार एसीबीने पडताळणी केली असता लाचेची मागणी स्पष्ट झाली. तडजोडीनंतर पहिला हप्ता म्हणून १० हजार रुपये स्वीकारण्यास आरोपीने संमती दिली होती.

दरम्यान, सापळा रचून पंचांसमक्ष तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना सचिन इंगळे यांना रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

यावेळी पथकातील कर्मचारी पोहेकॉ दिपक जाधव, अमोल झिने, पोलीस नाईक जगदीश पवार, पोलीस कॉन्स्टेबल शैलेश सोनवणे, लक्ष्मीकांत इंगळे, रंजीत व्यवहारे, पंढरी शेळके व अर्शद शेख यांनी कारवाईत सहभाग घेतला. दरम्यान, शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी लाच मागत असल्यास नागरिकांनी ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा येथे संपर्क साधून तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक भागोजी चोरमले यांनी केले आहे.

### अधिकारी व पथकाचा सहभाग

- ही कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.
- सापळा अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक भागोजी चोरमले, तसेच पोलीस निरीक्षक रमेश पवार यांनी प्रमुख भूमिका बजावली.

# एसटीचा दैनंदिन एक कोटी ६० लाख रुपये तोटा कमी करण्याचे आव्हाण

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे (एसटी) आर्थिक वर्षातील उत्पन्न ११ हजार ४७५ कोटी रुपये असून खर्च १२ हजार ६६ कोटी आहे. एसटीचा दैनंदिन तोटा एक कोटी ६० लाख रुपये आहे. हा तोटा कमी करण्यासाठी विविध प्रकाराच्या उपाययोजना करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

एसटीचे दैनंदिन सरासरी उत्पन्न ३१ कोटी ४० लाख आहे. त्याचवेळी खर्च ३३ कोटी रुपये आहे. दररोज एसटी महामंडळ एक कोटी ६० रुपये तोटा सहन करावा लागत आहे. हा तोटा चिंतेचा विषय असल्याचे मत सरनाईक यांनी व्यक्त केले. मागील आर्थिक वर्षात जालना, परभणी, बुलढाणा, भंडारा, गडचिरोली, अकोला, धुळे आणि वर्धा हे ८ विभाग नफ्यात होते. उर्वरित २३ विभागापैकी नाशिक, कोल्हापूर, नागपूर, रत्नागिरी, सातारा आणि ठाणे या विभागांचा वाढता तोटा गंभीर चिंतेचा विषय असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

# मेहकर येथे 'निळ्या पाखरांचे' महामानवाला अभिवादन

## भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक रॅली




● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**मेहकर :** शहरातील शिवसेना जनसंपर्क कार्यालय येथे महामानव, विश्वरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त मेहकर येथील आयोजित भव्य दिव्य मिरवणूक रॅलीत केंद्रीय मंत्री ना. प्रतापरावजी जाधव,आ. संजयजी रायमुलकर यांनी सहभाग घेतला.

युगपुरुषाचे विचार हेच आपल्या प्रगतीचे अधिष्ठान आहेत. त्यांच्या समता, न्याय आणि बंधुत्वाच्या विचाराने प्रेरित होऊन आपण सर्वजण राष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देऊया.

यावेळी बुलढाणा लोकसभा शिवसेना संपर्कप्रमुख संजयजी सोनार, सभापती माधवराव जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख ऋषीभाऊ जाधव, शिवसेना उपजिल्हा संघटक दिलीपराव देशमुख, शिवसेना उपजिल्हा प्रमुख किसनराव बळी, शिवसेना तालुका प्रमुख सुरेशतात्या वाळुकर, शहरप्रमुख जयचंद बाढीया, युवासेना उपजिल्हाप्रमुख भूषण घोडे,नगरसेवक आकाताई गायकवाड, मनोज जाधव, विशाल काबरा, मोहण जाधव, बाळु शिंगनाथ, मंगेश गायकवाड यांच्यासह शिवसेना, युवासेना पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर प्रत्येकाच्या मनामनात पोहोचवण्याचा संकल्प या रॅलीच्या माध्यमातून दृढ झाला. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या तत्वांचा संदेश देणारी ही रॅली अत्यंत प्रेरणादायी ठरली.
- कार्यकर्त्यांचा उस्फूर्त प्रतिसाद, युवकांचा जल्लोष आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती यामुळे संपूर्ण वातावरण "जय भीम" च्या घोषणांनी दुमदुमून गेले.

# अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाची प्रक्रिया स्थगित करावी

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या संदर्भातील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत गंभीर त्रुटी आहेत. त्यामुळे ही प्रक्रिया स्थगित करावी तसेच या संदर्भातील बदर समितीचा संपूर्ण अहवाल त्वरित सार्वजनिक करावा, अशी मागणी काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

आरक्षण हा काही विशिष्ट व्यक्ती किंवा कुटुंबांच्या आर्थिक स्थिती उंचावण्याचा कार्यक्रम नाही. आर्थिक उन्नतीसाठी राज्यघटनेत आणि शासनाकडे स्वतंत्र योजनांचे मोठे भांडार आहे. आरक्षण हे समाजाच्या सामूहिक हितरक्षण आणि सामाजिक न्यायासाठी आहे. त्यामुळे आरक्षणाच्या स्वरूपात बदल करताना अत्यंत पारदर्शक, न्याय्य आणि सर्वसमावेशक प्रक्रिया अपेक्षित असते. दुर्दैवाने, सध्या सुरू असलेल्या उपवर्गीकरण प्रक्रियेत ही पारदर्शकता दिसून येत नाही, अशी खंत पटोले यांनी व्यक्त केली आहे.

आरक्षण उपवर्गीकरणासाठी समाजाच्या कोणत्याही प्रतिनिधींचा समावेश न करता केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली. समितीचा अहवाल जनतेसमोर सार्वजनिक न करता केवळ आक्षेप मागवले जात आहेत.

# विशेष पटपडताळणीत 'गोलमाल'? माजी विद्यार्थ्यांना वर्गात बोलवून विद्यार्थी संख्या दाखविण्याची शक्यता

## पटपडताळणी इन कॅमेरा घेवुन स्थानिक पत्रकारांचा पथकात समावेश करा

● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने सुरू केलेल्या विशेष पटपडताळणी मोहिमेत देखील गोलमाल होत असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे.शाळेतल्या माजी विद्यार्थ्यांना बोलावुन पट दाखवण्याचाही केविलवाना प्रयत्न केल्या जावु शकते तसेच पथकातील अधिकार्‍यांना 'मॅनेज'करुन ऑल इज वेल दाखवण्याचाही प्रयत्न होणार अशी संभवना असल्याने होणारी पटपडताळनी इन कॅमेरा घेवुन पथकामध्ये पत्रकारांचाही समावेश करावा अशी मागणी होत आहे.



महाराष्ट्र राज्य सरकारच्या शिक्षण विभागानं राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांची पटपडताळणी सुरू केली आहे. राज्यात 'विशेष पटपडताळणी मोहीम' (पॅट) सुरू करण्यात आली आहे. पण या मोहिमेत शिक्षकांकडून विद्यार्थ्यांची पटसंख्या दाखवण्यासाठी गोलमोल सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार नाशिकमधून समोर आला आहे.'विशेष पटपडताळणी मोहिमेत' सहभागी शाळांनी विद्यार्थी संख्या पूर्ण करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांना वर्गात बोलविल्याचा प्रकार समोर आला आहे. मंगरुळपीर तालुक्यातही अशी क्लृप्ती वापरन्याची संभवना दिसते. पटपडताळणीचा दुसरा टप्पा सुरू झाला असून, 22 एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे.

### पडताळणीचा केवळ फार्स

◆ परीक्षा सुरू असताना अधिकारी वर्गात गेले आणि त्यांनी फक्त हजर विद्यार्थ्यांची संख्या मोजली. शाळांनी विद्यार्थ्यांना अगोदरच सूचना केलेली असल्यामुळे त्या विद्यार्थ्यांनी बरोबर त्या मुलाचे नाव घेतल्यानंतर हजेरी दिली. त्यामुळे अधिकाऱ्यांनाही शंका आली नाही. स्टुडंट्स पोर्टलवर मुख्याध्यापकांचे लॉगिन उघडले. त्यावर उपस्थित विद्यार्थ्यांच्या नावापुढे खुणा केल्या.असे बहुदा पथकाकडुन केल्या जावु शकते.

### दहा वर्षानंतर पुन्हा शाळांची पटपडताळणी; गोलमाल करणाऱ्या शिक्षकांची धास्ती वाढली

जिल्हा परिषद शाळांच्या तपासणीचे नियोजन तालुका स्तरावर गट शिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथके तैनात करण्यात आली. यामध्ये खासगी शाळांच्या पटपडताळणीसाठी 'डायट'चे अधिव्याख्याता, शिक्षण विभागातील अधिकारी, पोषण आहार विभागाचे लेखाधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांचे पथक आहे. तसंच ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळांच्या पटपडताळणीसाठी पंचायत समितीतील पर्यवेक्षक, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, ग्रामंपचायत अधिकारी, जिल्हा परिषदेचे विविध खातेप्रमुखांच्या पथकांनी शाळेत जाऊन पट व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची पडताळणी सुरू केली. त्यासाठी वर्गात बसविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये शाळा सोडून गेलेल्या विद्यार्थ्यांना बोलवून बसविण्याची संभवना आहे.शिक्षण विभागाच्या पडताळणीतून असे प्रकार उघडकीस येणे अपेक्षित आहे. पण बहुतांशी त्यांनी फक्त विद्यार्थ्यांची संख्याच मोजल्याचे कळते. पण पथकाने सखोलपणे पडताळनी करावी अशी मागणी होत आहे.

### हीच मेख अन् 'गोलमाल' सुरू?

◆ शालेय शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार त्या-त्या वर्गात उपस्थित विद्यार्थ्यांचा फोटो अपलोड करणे बंधनकारक आहे. पण सतत पोर्टल 'हॅंग' होत असल्याचे कारण पुढे करुन त्याला फाटा देण्यात येवु शकतो.हाच फायदा घेत, शिक्षक अन् शाळा व्यवस्थापन विशेष पटपडताळणी मोहिमेत गोलमाल करणार असल्याची चर्चा आहे.

### विशेष पटपडताळणी इन कॅमेरा व्हावी

◆ सुरु असलेल्या पटपडताळणीला पथकासमवेत पत्रकारांना बोलावुन सदर पटपडताळणी ही इन कॅमेरा घ्यावी म्हणजे बोगस विद्यार्थीसंख्या ऊघड होण्यात मदत होईल आणी अशा गोलमाल करणाऱ्या संस्था,शाळांना चाप बसेल.

# सिद्धार्थ महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी




● दिव्य मातृछाया
● मो. नवाज कुरेशी

**जाफराबाद :** दि. १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जाफराबाद येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या जयंती व्याख्यानमालेचे चौदावे पुष्प अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल भाऊ म्हस्के हे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून जाफराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. सतीश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपप्राचार्य प्रो. डॉ. सुनील मेढे, डॉ. श्याम सर्जे, प्रा. विनोद हिवराळे, मूल्यशिक्षण समिती प्रमुख प्रो. डॉ. संतोष पहारे, तसेच प्रा. डॉ. विजय पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

◆ प्रमुख वक्ते मा. सतीश जाधव यांनी आपल्या प्रभावी भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा स्वीकार केल्याशिवाय समाजाची खरी प्रगती शक्य नाही." त्यांनी पुढे भारतीय राज्यघटनेचे महत्त्व स्पष्ट करत नागरिकांनी आपल्या अधिकारांसोबत कर्तव्यांची जाणीव ठेवणे आवश्यक असल्याचेही नमूद केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. राहुल भाऊ म्हस्के यांनी सांगितले की, दिनांक २ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत एकूण १४ मान्यवर वक्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक कार्यावर सखोल मार्गदर्शन केले. या व्याख्यानमालेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विचारप्रबोधन होऊन खऱ्या अर्थाने जयंती साजरी करण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच आगामी काळात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त अशाच प्रकारची व्याख्यानमाला आयोजित करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अंकाचे संपादक प्रा. डॉ. विजय पाटील यांनी अंक निर्मिती प्रक्रियेतील बारकावे आणि गुणवत्तेची जपणूक याबाबत माहिती दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. संतोष पहारे यांनी व्याख्यानमालेचे नियोजन, विषय निवड आणि वक्त्यांची निवड याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अमरसिंग धवलिया यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रसिद्ध प्रमुख प्रा. अनिल वैद्य महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

# मेहकर शहर काँग्रेस कमिटी च्या वतीने जयंती निमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मेहकर दि. 14 एप्रिल रोजी :** भारतरत्न, महामानव,बोधिसत्व, संविधानाचे जनक, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त मेहकर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाटिकेत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष मेहकर व मित्र पक्षाच्या च्या वतीने मा. नगराध्यक्ष कासम गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे सरचिटणीस शाम उमाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. डॉ बाबासाहेब आंबेडकर वाटीकेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाम उमाळकर हे होते.यावेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास उपस्थित मान्यवरांच्या शुभ हस्ते हार अर्पण करण्यात.



◆ या वेळेस या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेहकर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज हजारी यांनी केले तर अँड. किशोर धोंडगे, अँड. अनंतराव वानखेडे, नगर परिषदेचे मा. उपाध्यक्ष जयचंद बाठीया, बाळासाहेब ससाणे आणि शाम उमाळकर यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादनाच्या कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते अँड. अनंतराव वानखेडे सरचिटणीस बु. जि. काँग्रेस कमिटी,न. प. उपाध्यक्ष मो.अलीम ताहेर, मेहकर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज हजारी, शिवसेना शहर प्रमुख जयचंद बाठीया अँड. किशोर धोंडगे, नगर सेवक मुजिब हसन कुरेशी, नियोजन व विकास सभापती अख्तर चौधरी,नगर सेवक वैभव उमाळकर, महेबूब गवळी, निलेश मानवतकर, इब्राहिम चौधरी,वासिम कुरेशी नगर सेवक मनोज जाधव, मोहन जाधव, अक्का गायकवाड,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक इब्राहिम रेघीवाले,गजेंद्र माने सर, प्रल्हाद कानोडजे, बाळू ससाणे, स्मित सावजी, शेषराव लंबे, विजय देवडे, अजीम खान पेंटर, बंडू आंधळे, इमाम गौरवे, महंमद गौरवे,साबीर बेग, आसिफ पठाण, चांद भुरीवाले, सुभान चौधरी,आणि लल्ला चौधरी यांची आणि तसेच पदाधिकारी, नेते आणि कार्यकर्ते यांची फार मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संचालन गजेंद्र माने सर यांनी केले.

# शिवसेनेच्या कार्याध्यक्षपदाची धुरा आदित्य ठाकरेंवर?



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

मुंबई : शिवसेनेत (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांच्यावर संघटनात्मक जबाबदारी टाकण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात येणार असून यासाठी १९ जून रोजी शिवसेनेच्या वर्धापनदिनाचा मुहूर्त ठरविण्यात आल्याचे समजते. २०१२ साली उद्धव ठाकरे पक्षप्रमुख झाल्यानंतर कार्याध्यक्षपद रिक्त असून या जागी आदित्य ठाकरे यांची निवड झाल्यास पक्षाचे महत्त्वाचे अधिकार त्यांच्याकडे येणार आहेत.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकांपासून आदित्य ठाकरे हे राजकारणात सक्रिय झाले. २०१९ साली उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात पर्यावरणमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर आदित्य ठाकरे यांच्याकडे शिवसेनेतील महत्त्वाचे पद सोपविले जाणार आहे. शिवसेनेच्या राज्यभरातील पदाधिकाऱ्यांची उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या बैठकीदरम्यान आदित्य ठाकरे यांच्यावरील जबाबदारीची जाणीव पदाधिकाऱ्यांना करून देण्यात आली.

त्यानंतरच याविषयी अंतिम निर्णय घेण्यात आला. राज्यातील महत्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आटोपल्या आहेत. आता थेट २०२९ मध्येच लोकसभा आणि विधानसभा निवडणुका होतील.

# अवैध दारुअड्ड्यावर मानोरा पोलिसदलाची धाड



● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** पोलीस स्टेशन मानोरा अंतर्गत ग्राम कारली येथे दिनांक 15/04/2026 रोजी दुपारी 12.30 ते 13.00 वा च्या सुमारास ग्राम कारली येथील ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीवरून ग्राम कारली येथील आरोपी नामे अमर दादाराव राऊत वय 37 वर्ष राहणार कारली तालुका मानोरा जिल्हा वाशिम याच्या राहत्या घरी दोन पंचा समक्ष पोलीस पाटील व सोबत पोलीस स्टाफ च्या मदतीने प्रोव्हिजन रेड केली असता आरोपी याच्या राहते घरी प्लास्टिकच्या सहा ड्रम मध्ये व काही जमिनीमध्ये गाळलेल्या ड्रममध्ये 900 लिटर सडवा मोहमाच किमत 90,000 रु व प्लास्टिकच्या कॅनमध्ये 140 लिटर ग. हा. भा. दारू किंमत 14,000 रु व दारु बनवायचे इतर साहित्य 10,000 रु असा एकूण1,14,000 रु ची प्रोव्हिजन रेड करण्यात आली.

सदर कारवाई माननीय पोलीस अधीक्षक साहेब, अनुज तारे सर, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक, लता फड उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा श्रीमान प्रदीप पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली पोनिसा नैना पोहकर,पोहेका राधेशाम महले, पोका /424 चेतन भोयर मपोका / 545 कविता गुर्डे व होमगार्ड सैनिक यांनी केली.

# तुकाराम मुंढे अजूनही नियुक्तीच्या प्रतिक्षेत

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबईः** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी प्रशासनात फेरबदल करताना पाच सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश दिले आहेत. मात्र नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या तुकाराम मुंढे यांना नव्या पदावरील नियुक्तीसाठी आणखी काही काळ वाट पहावी लागणार आहे.

राज्य सरकारने ३१ मार्चला प्रशासनात फेरबदल करताना दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्यासह १० अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या.

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)
Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711
हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो.माळीपेठ, इमाम बाडा चौक, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक- शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा.9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत
(टिप:- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त अभिवादन उत्साहात

● दिव्य मातृछाया
● रवि ढवळे

**सिंदखेडराजा दि. 14 एप्रिल :** थोर पुरुष महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त शहरात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी सकाळपासूनच नागरिकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी व विविध संघटनांनी एकत्र येत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

तसेच माजी आमदार शशिकांत खेडेकर, नगराध्यक्ष सौरभ तायडे, माजी नगराध्यक्ष सतीश तायडे, सिताराम चौधरी, बाळाजी तायडे, योगेश मस्के, शिवप्रसाद ठाकरे, छगनदादा मेहेत्रे, मंगेश खुरपे, मंगेश बारोवकर, शहाजी चौधरी, किशोर जाधव तसेच आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



♦ पंचशील ध्वजाला अभिवादन करून बौद्ध परंपरेनुसार पंचशील वाचन करण्यात आले आणि त्यांच्या विचारांचा जागर केला गेला. याचबरोबर कार्यक्रमादरम्यान फटाक्यांची आकाशबाजी करण्यात येत जयंतीचा उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमात प्रशासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी संजय खडसे, ठाणेदार आशिष इंगळे व नगरपरिषद मुख्याधिकारी आशिष बोबडे यांनी उपस्थित राहून अभिवादन केले.

♦ तसेच उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांनी भीम गीत गायन करून उपस्थितांना प्रेरित करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन केले.

याचप्रमाणे भीमसैनिकही मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी उत्साहात सहभाग नोंदविला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेसाठीच्या लढ्याचा, शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेल्या कार्याचा आणि भारतीय संविधान निर्मितीतील त्यांच्या अमूल्य योगदानाचा गौरव केला.

तसेच त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान शिस्तबद्ध वातावरणात अभिवादन करण्यात आले असून नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदविला. संपूर्ण कार्यक्रम शांततेत, अनुशासनात व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# पत्रकार अहेमद कुरेशी यांचा "राष्ट्रीय समाज रत्न पुरस्काराने" सन्मान

## सातत्यपूर्ण पत्रकारिता व समाजकार्याची दखल



● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**मेहकर :** येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयात तथागत बहुउद्देशीय संस्था व संबंधित संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात साखरखेर्डा येथील पत्रकार शेख अहेमद शेख जुसुफ कुरेशी यांना "राष्ट्रीय समाज रत्न पुरस्काराने" सन्मानित करण्यात आले. १२ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या या कार्यक्रमात त्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व भेटवस्तू प्रदान करण्यात आली.

♦ पत्रकार अहेमद कुरेशी गेल्या काही वर्षांपासून पत्रकारितेत सक्रिय असून अन्यायग्रस्तांच्या प्रश्नांना वाचा फोडून न्याय मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. दै. दिव्य मातृछायाचे सिंदखेडराजा तालुका विशेष प्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत समाजसेवा व निर्भीड पत्रकारितेतून त्यांनी समाजात जागरूकता निर्माण केली आहे.

यापूर्वीही त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून २०२४ मध्ये मिळालेला राज्यस्तरीय "साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे रामाजभूषण पुरस्कार" तसेच पत्रकार स्पर्धेत मिळवलेला तृतीय क्रमांक हे त्यांच्या कार्याची साक्ष देतात.

या सन्मानामुळे कुरेशी समाजात आनंदाचे वातावरण असून युवकांना प्रेरणा मिळत आहे. विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष संदीप गवई, कार्याध्यक्ष कुणाल माने, संदीप राऊत तसेच अध्यक्षस्थानी दिलीप खरात उपस्थित होते. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती होती. अहेमद कुरेशी यांनी आयोजकांचे आभार मानले.

# विचारातून आणि विकासकामांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

## जवळपास सुमारे १ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मेहकर :** येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त नगरपरिषद मेहकरच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. अशोक वाटिका येथे आयोजित कार्यक्रमात बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी बाबासाहेबांनी दिलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्यायाच्या विचारांचा अंगीकार करून समाजातील सर्व घटकांनी एकत्र येत प्रगती साधण्याची आवश्यकता व्यक्त केली. तसेच उपस्थित नागरिकांना जयंतीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

♦ यानंतर नगरपरिषद मेहकरच्या वतीने नगराध्यक्ष किशोर गारोळे यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. सुमारे १ कोटी रुपयांच्या या विकासकामांमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत टिन शेड डोम (₹१३.४१ लक्ष), व्यायामशाळा, अभ्यासिका व स्वच्छतागृह (₹२७.८८ लक्ष), सांस्कृतिक सभागृह (₹२०.५३ लक्ष) तसेच सामूहिक सभागृह बांधकाम व सौंदर्यीकरण (₹२२ लक्ष) या कामांचा समावेश आहे. या माध्यमातून शहरातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम होऊन नागरिकांना थेट लाभ मिळणार आहे.

या कार्यक्रमास आमदार सिद्धार्थजी खरातसाहेब, नगराध्यक्ष किशोरभाऊ गारोळे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटनेते विलासजी चनखोरे, नगरसेवक सतीशजी ताजने, नगरसेवक नितीनजी तुपे, नगरसेवक महेशजी रिंढे, नगरसेवक सौ रुपालीताई गारोळे, नगरसेवक अमोलजी घोड़े, निसार अंसारी, युवा सेना तालुका प्रमुख ॲड. आकाशजी घोडे, सुरेश विश्वनाथ वाळुकर, सौ. प्रीती प्रवीण शिंगनाथ, गोपाल गायकवाड, मुख्याधिकारी रामराजे कापरे, मापारी तसेच नगरपरिषदेमधील सर्व अधिकारी, कर्मचारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिं.राजा जंगल परिसरात पशुपक्ष्यांसाठी पाणवठ्यांची सोय



● दिव्य मातृछाया
● रवि ढवळे

**सिंदखेड राजा दि. 14 एप्रिल :** शहरातील फॉरेस्ट जंगल परिसरात वाढत्या उन्हामुळे पशुपक्ष्यांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत असल्याचे दिसून येत आहे. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे मुक्या जनावरांना व विविध पक्ष्यांना पाण्याअभावी त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेता स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेत जंगल परिसरात ठिकठिकाणी पाणवठ्यांची व्यवस्था केली आहे.

या पाणवठ्यांमुळे जंगलातील पशुपक्ष्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः उन्हाच्या कडाक्यात पाण्यासाठी भटकंती करणाऱ्या जनावरांचे हाल कमी होण्यास मदत होणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविण्यात आला असून नागरिकांमध्ये याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

वन्यजीवांचे संरक्षण व त्यांची काळजी घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या उपक्रमावेळी मनसे जिल्हाध्यक्ष शिवादादा पुरंदरे, वकील मोबीन सय्यद, शेतकरी उमेश गिरी तसेच अविनाश भुसारे हे उपस्थित होते व त्यांनीही या कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला.

# पोलीस कर्मचाऱ्याने परत केली सोन्याची बॅग

## प्रामाणिकपणाची जिवंत साक्ष

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**वाशिम :** समाजात पोलीस दलाबद्दल विश्वास निर्माण करणारी आणि कर्तव्यनिष्ठेचा अभिमान वाटावा अशी प्रेरणादायी घटना आज वाशिम शहरात घडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सुरू असलेल्या मिरवणुकीदरम्यान कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचारी अश्फाक बेनिवाले यांनी दाखवलेला प्रामाणिकपणा आणि तत्परता समाजासाठी आदर्श ठरली आहे.



पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावर मिरवणूक सुरू असताना चाशिम येथील रेखा प्रल्हाद चव्हाण यांची नकळत एक बॅग खाली पडली. त्या बॅगमध्ये सुमारे एक तोळा सोन्याचे दागिने, रोख रकम आणि महत्त्वाची कागदपत्रे होती. कर्तव्यावर असलेल्या अश्फाक बेनिवाले यांच्या ही बाब लगेच लक्षात आली. दरम्यान, एका मोटार सायकलस्वाराने ती बॅग उचलून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. पण प्रसंगावधान राखत बेनिवाले यांनी तत्काळ पाठलाग करून त्या व्यक्तीला पकडले आणि बॅग सुरक्षित परत मिळवली.

♦ विशेष म्हणजे, बॅग हरविल्याचे लक्षात न आल्याने ते दांपत्य पुढे निघून गेले होते. तरीही "मालक परत येईल या विश्वासाने अश्फाक बेनिवाले त्या ठिकाणीच बॅग हातात घेऊन थांबून राहिले. काही वेळानंतर ते दांपत्य परत आल्यानंतर बॅगमधील सर्व वस्तूंची खातरजमा करून त्यांनी ती बॅग त्यांच्या स्वाधीन केली.

ही घटना केवळ एक बॅग परत देण्याची नाही, तर प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता आणि समाजाप्रती निष्ठा यांचे जिवंत उदाहरण आहे. "सद्रक्षणाय खलनिग्रहणाय" या महाराष्ट्र पोलीस दलाच्या ब्रीदवाक्याला अश्फाक बेनिवाले यांनी प्रत्यक्ष कृतीतून अर्थ दिला आहे.

या उल्लेखनीय कार्याबद्दल शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार संजय चौधरी यांनीही त्यांचे कौतुक केले आहे.

आज अशा प्रामाणिक पोलीस कर्मचाऱ्यांमुळेच पोलीस दलाविषयीचा समाजाचा विश्वास अधिक दृढ होत आहे. अश्फाक बेनिवाले यांचे मनापासून अभिनंदन! कर्तव्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणाची ही ज्योत अशीच पेटती राहो, हीच अपेक्षा

# मेहकर येथील शासकीय मुलींच्या वसतिगृहात 'सामाजिक समता सप्ताह' उत्साहात संपन्न


## वसतिगृहाचे नामकरण आता 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय मुलींचे वसतिगृह'

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलढाणा, दि.15 एप्रिल :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलढाणा अंतर्गत कार्यरत असलेल्या मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृह, मेहकर येथे 8 एप्रिल ते 14 एप्रिल या कालावधीत 'सामाजिक समता सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहाचे औचित्य साधून वसतिगृहाच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले असून, आता हे वसतिगृह 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय मुलींचे वसतिगृह, मेहकर' या नावाने ओळखले जाणार आहे.

♦ सप्ताहाची सुरुवात 8 एप्रिल रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या वाचनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींसाठी विशेष भाषण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा वानखेडे (बी.फार्म) यांनी तर कार्यक्रमाचे अध्यक्षपद गृहपाल संध्या देखणे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून सलोनी सदाशिव (बी.फार्म) यांनी संविधानावर सखोल मार्गदर्शन केले. नेहा इंगळे, संघमित्रा वानखेडे आणि साक्षी ताजने या विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून संविधानाचे महत्त्व विषद केले.

11 एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त 12 एप्रिल रोजी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थिनींनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून महापुरुषांच्या विचारांना उजाळा दिला.



14 एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित गीते गायली आणि आपले मनोगत व्यक्त केले. या सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनींसह बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप प्र. गृहपाल संध्या देखणे यांनी सर्वांचे आभार मानून केला. सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या या सप्ताहामुळे वसतिगृहात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

# विषमतेच्या शृंखला तोडण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर संघर्ष केला

● दिव्य मातृछाया
● राहुल सरदार

**लोणार :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसामान्य, दीन-दलितांना जगण्याचा मूलभूत अधिकार मिळवून दिला. सामाजिक अस्पृश्यता नष्ट करून समतेचा अधिकार देत त्यांनी शोषित आणि वंचित घटकांना सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला. भारतीय समाजव्यवस्थेत रूजलेल्या विषमतेच्या शृंखला तोडण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला आणि जातीभेद निर्मूलनासाठी लढा उभारल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे गटनेते तथा नगरसेवक मयुर गोलेच्छा यांनी आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नगरपालिकेत आयोजित कार्यक्रमात केले.



भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतांना माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक भूषण भाऊ मापारी, शिवसेनेचे गटनेते मयुर गोलेच्छा व उपस्थित सर्व नगरसेवक.

♦ यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. नगरपालिकेचे सर्व नगरसेवक आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करत समाजातील सर्व घटकांनी त्यांच्या विचारांवर चालण्याचे आवाहन करण्यात आले.

♦ कार्यक्रमात बोलताना शिवसेनेचे नगरसेवक तथा गटनेते मयुर गोलेच्छा यांनी पुढे सांगितले की, बाबासाहेबांनी दलित समाजाला आत्मसन्मानाने जगण्याची प्रेरणा दिली आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. "प्रत्येक भारतीयाने प्रथम आणि शेवटी भारतीयच राहिले पाहिजे," हा त्यांचा ठाम विचार होता. देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळाल्याशिवाय खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य पूर्ण होत नाही, यावर त्यांचा भर होता.

♦ त्यामुळे दलित समाजाला सामाजिक-आर्थिक न्याय मिळून त्यांना राजकीय सत्तेतही योग्य सहभाग मिळावा, हा त्यांचा प्रमुख आग्रह होता.

शिवाय दलित समाजाचे हित जपणे हेच महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकारणाचे मूलभूत सूत्र होते. त्यांनी दिलेल्या संविधानामुळे प्रत्येक नागरिकाला समान हक्क मिळाले असून, आज देशातील लोकशाही अधिक बळकट झाली आहे. त्यांच्या विचारांचे पालन करूनच समाजात खरी समता आणि बंधुता निर्माण होऊ शकते, असेही गटनेते मयुर गोलेच्छा यांनी सांगितले.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक भूषणभाऊ मापारी, न.प.उपाध्यक्ष आबेद खान, पंढरीभाऊ चाटे, रमजान परसुवाले, महिला व बालकल्याण सभापती पती संतोषभाऊ मापारी, अर्थ व नियोजन सभापती साहेबराव पवार, आरोग्य सभापती अ.उबेद अ. मुनाफ, नगरसेवक गुलाबभाई सरदार, शिवसेनेचे नगरसेवक अक्षय इंगळे, शेख जलील, भाजयुवा जिल्हा सरचिटणीस शुभम देसाई, भाजप नेते शुभम भगत,पाणीपुरवठा अभियंता महेश राठोड,कार्यालय अधीक्षक अंकुश जाधव, करनिरीक्षक कैलास नेवरे, तसेच सुनील इरतकर, सुधीर काळे, संजय एंनेवार, अनंता कायंदे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेच त्यांच्या विचारांचे स्मरणकरून सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# राज्यात नव्याने १० वैद्यकीय महाविद्यालयांना मान्यता

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**सांगली :** राज्यात सध्या ३६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत असून नव्याने १० महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे सुमारे एक हजार एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत.

जपानच्या जायका' बँकेकडून सुमारे चार हजार कोटी रुपयांचे कर्ज मिळणार असून त्यातून नवीन महाविद्यालये व नर्सिंग शिक्षणाचा विस्तार होणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथील अत्याधुनिक अतिदक्षता कक्षाचे लोकार्पण व केंद्र पुरस्कृत सभागृह व वसतिगृहांच्या कामांचे भूमिपूजन, तसेच सांगली येथील मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे उद्घाटन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार इद्रिस नायकवडी, आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव, उपअधिष्ठाता डॉ. श्रीकांत अहंकारी, वैद्यकीय उपअधिक्षक डॉ. रूपेश शिंदे आदि उपस्थित होते.

मंत्री मुश्रीफ यावेळी म्हणाले, सांगली सिव्हील हॉस्पिटलमध्ये राज्य शासनाच्या निधीमधून सात मॉड्युलर ऑपरेशन थिएटर मंजूर करण्यात आले. त्यातील ५ मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण करण्यात आले. त्यासाठी राज्य शासनाने सुमारे २० कोटी रूपयांचा निधी मंजूर करून दिला आहे. याचा गोरगरीब रूग्णांना फायदा होणार आहे. मिरज सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ४० बेडचा मॉड्युलर आयसीयु राज्य शासनाच्या निधीतून तयार करण्यात आला आहे. त्यामुळे मोफत तसेच कमी पैशांमध्ये वैद्यकीय सुविधा देणे शक्य झाले आहे. राज्य शासनाने राज्यात पहिली डिजिटल ब्रेन अंन्जीओग्राफी मशीन मिरज मध्ये मंजूर करून सुरू केली आहे. त्यामुळे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करणे सोपे झाले आहे.

# सिं.राजा नगरपरिषदेत भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून राजकीय वातावरण तापले

## विरोधकांचा सत्ताधाऱ्यांवर जोरदार पलटवार

● दिव्य मातृछाया
● रवि ढवळे

**सिंदखेडराजा :** नगरपरिषदेमधील भुयारी गटार, पाणीपुरवठा, स्वच्छता व विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जाचे काम व आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करत विरोधी पक्षनेते निलेश देविदास ठाकरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रशासनावर तीव्र टीका केली आहे. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे पुराव्यानिशी तक्रार देऊनही प्रशासनाने कोणतेही ठोस उत्तर दिले नसून सत्ताधाऱ्यांच्या माध्यमातूनच प्रतिक्रिया दिली जात असल्याने प्रशासन व सत्ताधाऱ्यांमध्ये संगनमत असल्याचा गंभीर संशय त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, मनोज कायंदे यांच्यावर करण्यात आलेले आरोप पूर्णपणे खोटे व राजकीय द्वेषातून प्रेरित असल्याचे सांगत त्यांचा विरोधकांनी निषेध केला.



♦ सत्ताधाऱ्यांकडून स्वतःच्या अपयशावर पडदा टाकण्यासाठी विरोधकांवर आरोप केले जात असल्याची टीका करण्यात आली. पाणीपुरवठा योजनेचा कार्यारंभ 11 नोव्हेंबर 2022 रोजी झाला असून नियोजित कालावधीत काम पूर्ण न झाल्याने शासन व करदात्यांवर आर्थिक बोजा पडल्याचे नमूद करण्यात आले. तसेच भुयारी गटार योजनेचे काम 11 ऑक्टोबर 2024 पासून सुरू होऊन 18 महिन्यांत पूर्ण करणे अपेक्षित असतानाही अद्याप अपूर्ण असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

♦ या दोन्ही योजनांच्या DPR मध्ये मोठी वाढ झाल्याचे सांगत प्रशासन, सत्ताधारी व ठेकेदार यांच्या हलगर्जीपणामुळे जनतेच्या पैशांवर अतिरिक्त भार पडत असल्याचा आरोप करण्यात आला. STP प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून देण्यात सत्ताधारी अपयशी ठरल्याचे सांगत नाझेर काझी यांनी पुढाकार घेऊन जमीन उपलब्ध करून दिल्याचा उल्लेख करण्यात आला.

याचदरम्यान निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नवीन पाणीपुरवठा योजना फुटून लाखो लिटर पाण्याची नासाडी झाल्याचा आरोप करत त्याची जबाबदारी कोण घेणार असा सवाल उपस्थित करण्यात आला. शहरातील विकासकामांसाठी मिळालेला निधी हा पालकमंत्री मकरंद पाटील, आमदार मनोज कायंदे, नाझेर काझी व माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे यांच्या प्रयत्नातून मिळाल्याचा दावा करत सत्ताधाऱ्यांकडून "आयत्या पिठावर रेघोट्या" ओढल्या जात असल्याची टीका करण्यात आली. तसेच सौरभ तायडे यांनी विरोधकांना दिलेल्या "२५ वर्षांचे बाड काढू" या वक्तव्यावरही विरोधकांनी जोरदार प्रत्युत्तर देत मागील २५ वर्षांत विविध पक्ष सत्तेत होते, त्यामुळे केवळ विरोधकांना लक्ष्य करणे योग्य नसल्याचे म्हटले आहे.

सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी धमकीची भाषा न वापरता स्वतःच्या कामगिरीचा हिशोब जनतेसमोर मांडावा, तसेच जर खरोखरच गैरप्रकारांचे पुरावे असतील तर ते संबंधित यंत्रणेकडे सादर करून निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली. प्रशासनाकडून तक्रारींवर उत्तर न देता सत्ताधाऱ्यांकडूनच प्रतिक्रिया दिली जात असल्यामुळे संशय अधिकच बळावला असल्याचेही त्यांनी नमूद केले. शहरातील नागरिकांना निकृष्ट कामांमुळे मोठा त्रास सहन करावा लागत असून पाणीपुरवठा योजनेतील गळतीमुळे लाखो लिटर पाण्याची नासाडी झाल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

वाढीव DPR मुळे शासनावर आर्थिक ताण वाढत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत सर्व कामांचे तांत्रिक व आर्थिक ऑडिट करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

याशिवाय प्रशासनाने त्वरित आपली भूमिका स्पष्ट करून जनतेसमोर सत्य मांडावे, अशी मागणी करण्यात आली. सर्व विकासकामांची उच्चस्तरीय व न्यायालयीन देखरेखीखाली चौकशी करण्यात यावी, दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. निलेश देविदास ठाकरे (विरोधी पक्षनेते, नगर परिषद सिंदखेड राजा) तसेच समस्त नगरसेवक, नगरसेविका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भाजपा सिंदखेडराजा यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# प्रेमसंबंधातून युवकाची निर्घृण हत्या

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलढाणा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशी बुलढाणा शहरात घडलेल्या एका खळबळजनक घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. जयस्वाल चौक परिसरात उशिरा रात्री एका युवकावर धारदार शस्त्राने हल्ला करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे शहरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृत युवकाचे नाव सागर उर्फ पप्पू जाधव (वय 38, रा. भीमनगर, बुलढाणा) असे असून या प्रकरणात सोनू जाधव (रा. भीलवाडा, बुलढाणा) हा मुख्य आरोपी असून तो सध्या फरार आहे. पोलिसांनी त्याच्या शोधासाठी पथके रवाना केली आहेत.



आरोपी



मृतक

### प्रेमसंबंधातून वाद, हत्येचे कारण स्पष्ट

♦ प्राथमिक तपासात या हत्येमागे प्रेमसंबंधातून निर्माण झालेला जुना वाद कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. आरोपीच्या नातेवाईक असलेल्या एका महिलेबाबत मृतक सागर याच्याशी संबंध असल्याने दोन्ही कुटुंबांमध्ये तणाव निर्माण झाला होता. आरोपीने यापूर्वीही जीवे मारण्याची धमकी दिल्याचे सांगितले जात आहे. याच वैमनस्यातून हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### मिरवणुकीवरून परतताना हल्ला

♦ मिळालेल्या माहितीनुसार, दि. 14 एप्रिल रोजी आंबेडकर जयंतीनिमित्त शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सागर जाधव हा देखील या मिरवणुकीत सहभागी झाला होता. मिरवणूक संपल्यानंतर रात्री सुमारे 11.30 वाजता तो घरी परतत असताना जयस्वाल चौकात आरोपीने त्याच्यावर अचानक हल्ला केला. सोनू जाधव याने मागून येत धारदार चाकूने सागरच्या पाठीवर वार केला. गंभीर जखमी झालेला सागर रस्त्यावर कोसळला.

### उपचारादरम्यान मृत्यू

♦ घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तात्काळ सागरला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र अतिरक्तस्त्रावामुळे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**खुनाचा गुन्हा दाखल, तपास सुरू**

मृतकाच्या आई पुष्पा जाधव यांच्या तक्रारीवरून बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात अप. क्र. 280/2026 अंतर्गत भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 103(1) नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

**संतप्त युवकांचा उद्रेक; घराची तोडफोड**

या घटनेनंतर संतप्त झालेल्या काही युवकांनी आरोपीच्या घरावर हल्ला करत तोडफोड केली. सुमारे 7 युवकांनी घरात घुसून साहित्याची नासधूस केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे परिसरात तणाव आणखी वाढला.

**शहरात तणाव, पोलीस सतर्क**

घटनेनंतर बुलढाणा शहरात तणावपूर्ण वातावरण असून पोलिसांनी संवेदनशील भागात कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी प्रशासन सतर्क आहे. दरम्यान, फरार आरोपीचा शोध सुरू असून त्याला लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. तसेच तोडफोड करणाऱ्या युवकांविरोधातही कारवाई केली जाणार आहे.

# शिस्त, सखोल अभ्यास आणि लोककल्याण हीच बाबासाहेबांची कार्यशैली

## नायब तहसीलदार प्रांजल पवार : सिंदखेडराजा तहसील कार्यालयात डॉ बाबासाहेबांना अभिवादन

● दिव्य मातृछाया
● वसीम शेख

**मलकापूर पांग्रा :** सिंदखेड राजा तहसील कार्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



### डॉ. बाबासाहेबांचे विचार आत्मसात करा : डॉ. प्रवीण वराडे

♦ यावेळी मनोगत व्यक्त करताना महसूल नायब तहसीलदार डॉ. प्रवीण कुमार वराडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ एका समाजासाठी नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी आणि समतेसाठी आपले आयुष्य वेचले. त्यांचे विचार आणि त्यांनी दिलेली राज्यघटना ही देशाच्या प्रगतीचा आधारस्तंभ आहे. शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जनसामान्यांची सेवा करावी, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला निवासी नायब तहसीलदार प्रांजल पवार यांनी प्रास्ताविक भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अष्टपैलू कार्यशैलीवर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ कायदेतज्ज्ञ नव्हते, तर ते एक उत्तम प्रशासक आणि दूरदृष्टी असलेले अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांची कार्यशैली ही शिस्त, सखोल अभ्यास आणि लोककल्याणावर आधारित होती. प्रतिकूल परिस्थितीतही डगमगून न जाता ध्येय गाठण्याची त्यांची जिद्द आजही आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आजच्या प्रशासकीय युगात त्यांची कार्यपद्धती आणि पारदर्शकता आत्मसात करणे काळाची गरज आहे."

या कार्यक्रमाला महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने महसूल सहाय्यक तथा तालुका अध्यक्ष संजय सोनुने, मारोती थोरवे (मुख्यालय सहाय्यक), बुलबुले (तालुका भूमी अभिलेख), राजू भाऊ खरात, महसूल सेवक देशमुख, जानकीराम शिपे (ग्राम महसूल अधिकारी), डॉ. काळे (महसूल सहाय्यक), राजु चांगाडे, कृष्णा झोरे, शिवाजी शिंदे, कांबळे यांच्यासह तहसील कार्यालयातील इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी डॉ. बाबासाहेबांच्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला. कार्यक्रमाचे नियोजन महसूल कर्मचाऱ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने केले होते.